# अमरावती महानगरपालिका अमरावती
## सहायक संचालक नगर रचना

राजकमल चौक, अमरावती -४४४६०३ (दुरध्वनी क्र.०७२१-२५६१५६९)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Email :- commr.amtcorp@gmail.com

ना-हरकत प्रमाणपत्र क्रमांक : ७५

दिनांक : २५ /०७/२०२२

**प्रति,**

स्काय लाईन बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर तर्फे पाटनर्स
सनाउल्ला खान अब्दुल्ला खान,
आबिद खान शब्बीर खान,
शेख काशीफ शेख रौशन,
काजी जैनुल आबेद्दीन काजी आरिफोद्दीन,
रा. अमरावती

AMC अमरावती महानगरपालिका अमरावती

**विषय : विज पुरवठा मिळणेबाबत ना-हरकत प्रमाणपत्र.**
**संदर्भ : आपला अर्ज क्र.६७६ दि. ३०/१२/२०२१**

आपणास **भुखंड क्र. १३९, सर्व्हे क्र.१५/१, मौजा-तारखेडा,** सोसायटी ---, प्रभाग -, रस्ता - असलेल्या विद्यमान /नविन बांधकाम झालेल्या इमारतीत फक्त तात्पुरते / कायम स्वरुपाचे रहिवाशी वापराकरीता विज घेणे करीता महानगरपालिकेचे हरकत नसलेले हे प्रमाणपत्र खालील अटीवर देण्यात येत आहे.

१) विज पुरवठ्याचा वापर उद्योग मुख्यत: औद्योगिक, उद्योग विषयक अंतर्गत व्यवसायाकरीता मुळीच करता येणार नाही. त्याकरीता महानगरपालिकेची स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक आहे.

२) निवासी वापरा व्यतिरिक्त इतर वापराकरीता उपयोगात येणारा विज पुरवठा अवैध समजण्यात येवुन अर्जदारावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

३) विज पुरवठा प्रमाणपत्र.
   अ) अवैध विज वापराबद्दल.
   ब) अर्जदाराने चुकीच्या दिलेल्या माहिती बद्दल रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

४) आपले घर / झोपडी पुढे मागे काढुन टाकण्यात आल्यास आपणास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मागण्याचा हक्क राहणार नाही.

५) ना-हरकत प्रमाणपत्र आधारे शासकीय तथा खाजगी जागेवर कोणत्याही हक्क दावा करता येणार नाही.

६) घराचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर इमारत परवाना म.न.पा. तून प्राप्त केल्यानंतरच कायम स्वरुपीचे विज कनेक्शनकरीता ना-हरकत प्रमाणपत्र कार्यालयाकडुन प्राप्त करावे लागेल.

सहायक संचालक नगर रचना
महानगरपालिका, अमरावती

**AMRAVATI MUNICIPAL CORPORATION AMRAVATI**
**ASSISTANT DIRECTOR OF TOWN PLANNING**
RAJKAMAL CHOWK, AMRAVATI -444603
(Telephone No.0721-2561569) E-mail :- commr.amtcorp@gmail.com

**Office No./AMC/ADTP/75/2022**
**Date 25/07/2022**

## APPENDIX 'D-1'

### FORM FOR SANCTION OF BUILDING PERMISSION AND COMMENCEMENT CERTIFICATE

**To,**
**Sky Line Builders & Developer Tarfe Partners**
**Sanaullah Khan Abdullah Khan, Abid Khan Shabbir Khan,**
**Shaikh Kashif Shaikh Raushan, Qauzi Zainul Abeddin Qauzi Arifoddin,**
**Amravati**

AMC अमरावती महानगरपालिका अमरावती

Sir,

With reference to your application No.676, **Dated 30/12/2021** for the grant of sanction of Commencement Certificate under Section 18/44 of The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 read with Section (*) -------- of --------- Act, to carry out development work / Building on **Plot No.139,** Revenue **Survey No. 15/1,** Gat No......./ Khasara No..... . . . . ./ City Survey No.... .. . . . . . .**Plot No. 139, Mauje-Tarkheda,** situated at Road /Street________________, Society__________, the Commencement Certificate/Building Permit is granted under Section 18/45 of the said Act, subject to the following conditions:

1) The land vacated in consequence of the enforcement of the set-back rule shall form part of the public street in future.
2) No new building or part thereof shall be occupied or allowed to be occupied or used or permitted to be used by any person until occupancy certificate is granted.
3) The Commencement Certificate/ Building permit shall remain valid for a period of one year commencing from the date of its issue unless the work is not commenced within the valid period.
4) This permission does not entitle you to develop the land which does not vest in you.

इमारत व बांधकाम व्यवसायातील कामगार याच्या संदर्भात कामगार विभागानी निर्गमीत केलेले नियम/परिपत्रक/ प्रचलीत आदेश यांची जमिन मालक/विकासक यांनी पुर्तता करणे बंधनकारक राहील,असे न झाल्यास संबधीत जमीन मालक/विकासक यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही नियोजन प्राधिकरणाकडुन करण्यात येईल.

Asst. Director Of Town Planning
Amravati Municipal Corporation
Amravati

Authority or an officer appointed by it
(*) Name of the Act of the Planning Authority, if any, be mentioned or concerned sentence be deleted.
(Specimen of Stamp of Approval to be marked on building plan)

Municipal Corporation Amravati
**Terms & Conditions enclose page No. 1 & 2**

OFFICE OF THE **AMC**
Building Permit No. **75**
Date : **25/7/2022**
SANCTIONED.

# अमरावती महानगरपालिका अमरावती

## सहायक संचालक नगर रचना

राजकमल चौक, अमरावती -४४४६०३ (दुरध्वनी क्र.०७२१-२५६१५६९)
Email :- commr.amtcorp@gmail.com

AMC अमरावती महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**येथे इमारत बांधण्याकरीता मंजुरी मिळण्याचे संदर्भात खालील अटींवर मंजुरी व आरंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.**

१) समोरील, मागील व दोन्ही बाजूनी प्रत्येकी अंमलबजावणी करीता सोडावयास लागणाऱ्या नियमाचे अंमलबजावणीकरीता म्हणुन रिकामी झालेली जागा ही सार्वजनिक रस्त्याचा भाग असेल.

२) कोणत्याही इसमास राहण्याचे प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यत नविन इमारत अथवा तिचा भाग राहण्याकरीता/ उपयोग अथवा राहण्याकरीता परवानगी घेतलेली / उपयोगी होण्याकरीता नसेल.

३) आरंभ प्रमाणपत्र/ इमारत परवाना हे परवाना पत्र मिळालेल्या दिनांकापासुन एक वर्षाकरीता वैध राहील.

४) जी जमीन अर्जदाराच्या मालकीची नसेल ती विकसित करण्यासाठी परवानगी अधिकार देणार नाही.

५) नकाशा मंजूर केल्याप्रमाणे/लाल रंगाने त्यात दुरुस्त्या सुचविल्याप्रमाणे आपल्या घरास/ भुखंडास लागून असणाऱ्या विद्यमान इमारतीस एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीस अनुसरून प्रस्तावित घराचे / इमारतीचे बांधकाम असावयास पाहिजे.

६) न्हाणी व संडास, स्वयंपाकगृह इत्यादीचे सांडपाणी, घाण पाणी व कचरा यांची तांत्रिकदृष्ट्या योग्य रितीने विल्हेवाट लावावी. **कोणताही वाद उद्भवल्यास सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.**

७) अर्जदारास मंजुर नकाशा व्यतिरिक्त त्यांत फेरबदल करावयाचे असल्यास महानगरपालिकेची पुर्व मंजुरी घेणे आवश्यक राहील.

८) मंजुर करण्यात आलेल्या विकास कामाची / बांधकामाची सोबत पत्रकावरील माहिती सदर्हु भुखंडावर योग्य जागी सुचना फलक लाऊन त्यात लिहिण्यात यावी. त्याचप्रमाणे जाहिरातीच्या स्वरुपातही माहिती दोन वर्तमान पत्रकात (एक मराठी) प्रसिध्द करण्यात यावी.

९) भुखंडात कमीतकमी दोन झाडे लावावीत.

१०) सेप्टीक संडास व्हेंटीलेशन पाईपची उंची स्वतःच्या व शेजारी घराच्या उंचीपेक्षा १० फुट उंच ठेवावी. व्हेंटीलेशन पाईपच्या तोंडावर डास प्रतिबंधक जाळी लावावी. सेप्टीक टँकद्वारे मैला, इतर सांडपाणी स्वतःच्या खर्चाने पक्की नाही बांधून महानगरपालिकेच्या पक्कया नालीत मिळवावी.

११) सदर्हु परवानगी तुर्त जोत्यापर्यत धरण्यात यावी तथापी एकत्रिकरण मंजुर विकास व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुद २.८.४ प्रमाणे विकासकाने Appedix F मध्ये प्राधिकरणास कळविल्यानंतर जोत्यानंतर बांधकाम सुरु करणे बंधनकारक राहील.

१२) बिना परवानगी बांधकाम साहित्य, मलमा सार्वजनिक जागेवर किंवा रस्त्यावर टाकू नये, तसे आढळल्यास आपणावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१३) वरील पैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन केल्यास होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी मिळकतधारकाची राहील.

१४) भविष्यात म.न.पा.ला नाली करता जागा लागल्यास ती समास अंतरातून विनामुल्य द्यावी लागेल.

१५) मंजुर अभिन्यास / रेकॉर्ड प्रमाणे जागेची आखणी करुन घेण्याची व मालकी हक्काची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची आहे. जागेबाबत तसेच बांधकामाबाबत काही वाद उद्भवल्यास अर्जदाराची सर्वस्वी जबाबदारी राहील. म.न.पा.ची काहीही जबाबदारी राहाणार नाही.

१६) कंपाऊंड वॉलचे बांधकाम करताना विभागणी नकाशावर दाखविलेल्या दुरुस्तीप्रमाणे बांधकाम करणे बंधनकारक राहील.

१७) ना अनुज्ञेय बांधकाम अर्जदाराने स्वत: दोन महिन्याचे आत पाडून टाकावे, अन्यथा म.न.पा. कोणतीही नोटिस न देता पाडून टाकेलच. होणाऱ्या नुकसानीस अर्जदार स्वत: जबाबदार राहील व पाडण्याचा खर्च म.न.पा. वसूल करेल.

१८) पिण्याचे पाण्याची उपलब्धता वाढविणेबाबतचे स्त्रोत बळकटी करण्याकरीता दिलेल्या योजनेप्रमाणे व्यवस्था करावी आपणास इमारत वापर परवाना मिळणार नाही.

१९) विद्यमान रस्त्याची रुंदी ४, ५ मी. पेक्षा कमी असल्यास रस्त्याचे मध्यापासून दोन्ही बाजुला २.२५ मी. अंतरापर्यंतची जागा ही रस्ता म्हणुनच सोडावी लागेल. याबाबत कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळणार नाही.

२०) सौर उर्जेवर पाणी तापविण्याचा पद्धतीचा वापर करावा.

२१) घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत ओल्या कचऱ्यापासुन खतनिर्मीती व सुक्या कचऱ्याचे पुर्नवर्गीकरण (3R) करणे बंधनकारक राहील.

२२) किटकजन्य रोगांना आळा घालण्याच्या दृष्टीने करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबत आपल्या अधिनिस्त होणाऱ्या बांधकामामध्ये तळघर, तळमजला, कॉलमचे खड्डे, बांधण्यात आलेल्या संडासची टाके इत्यादी मध्ये पाणी साचुन राहणार नाही, तसेच साचलेले पाण्याचा निचरा त्वरीत करण्याबाबत आपल्या स्तरावर योग्य कार्यवाही करण्यात यावी.

२३) जागेबाबत, बांधकामाबाबत, न्यायालयीन काही वाद उद्‌भवल्यास त्यास अर्जदार स्वत: जबाबदार राहणार महानगरपालिका किंवा प्रशासन जबाबदार राहणार नाही.

## सूचना

१) संदर्भाधीन इमारत परवाना व आरंभ प्रमाणपत्राची मुदत आपणास प्रमाणपप प्राप्त झालेल्या दिनाकांपासुन एक वर्षापर्यत वैध असतांना मुदत दोन महिने अगोदर अर्जदारास पुढील एक वर्षाचे नूतनीकरण करण्याकरीता विहित नमुन्यात महानगरपालिकेत अर्ज करुन आवश्यक आहे.

२) महानगरपालिकेने मंजुर केलेल्या बांधकामातील पुर्व परवानगी न घेता केलेले फेरबदल हे अवैध व अनधिकृत असतील त्यामुळे .....

अ) आपणावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अंतर्गत कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

ब) आपणास महानगरपालिकातर्फे इमारत वापरण्याकरीता ॲक्युपेशन सर्टिफिकेट आवश्यक असलेल प्रमाणपत्र मिळणार नाही त्यामुळे महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडून विजपुरवठा आणि महानगरपालिका किंवा महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाकडून पाणी पुरवठा यापासुन वंचित राहील.

तरी कृपया मंजूर इमारत नकाशाप्रमाणे आपण बांधकाम करुन महानगरपालिकेला सहकार्य करावे.

सहायक संचालक नगर रचना
महानगरपालिका अमरावती